खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२१ – २२

### डॉ. संजय शिंदे यांच्या'माझ गाव, माझी माणसं' या पुस्तकाचे प्रकाशन

सकाळ



आंबोली (ता. खेड) : डॉ. संजय शिंदे यांच्या 'माझं गाव-माझी माणसं' या पुस्तकाचे प्रकाशन करताना ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील.


#### डॉ. शिंदे यांच्यात लेखनातून समाजात सकारात्मक संदेश : ॲड. बुट्टे पाटील

पाईट : "डॉ. संजय शिंदे यांच्या 'माझं गाव, माझी माणसं' या पुस्तकामुळे गावागावातील सामाजिक सलोखा वाढण्यास मदत होईल. त्यांच्या ग्रंथलेखनामुळे गावगाड्यातील व्यक्तिरेखा जिवंत झाल्या आहेत. मातीतल्या माणसांच्या चांगुलपणाची, नेतृत्वाची, कर्तृत्वाची उजळणी या ग्रंथामुळे झाली असून, समाजात सकारात्मक संदेश देण्याचे काम त्यांनी केले आहे," असे मत खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी व्यक्त केले. डॉ. शिंदे यांच्या पुस्तकाचे प्रकाशन आंबोली येथे झाले. त्यावेळी बुट्टे पाटील बोलत होते. यावेळी नाना टाकळकर, हिरामण सातकर, बाळासाहेब सांडभोर, डॉ. प्रकाश चौधरी, आंबोलीच्या सरपंच नकुशा शिंदे, उपसरपंच विष्णू काळडोके, माजी सभापती सुरेश शिंदे, मनोज खेडकर, शिवाजी शिंदे, बाळासाहेब शिंदे, डॉ. शिरीष पिंगळे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, शरद शिंदे, मारुती धंद्रे, बाळासाहेब शिंदे, दत्तात्रेय सुतार, बाळासाहेब घोंगडे आदी उपस्थित होते. यावेळी रोहिदास शिंदे यांनी पोवाडा सादर केला.कैलास मुसळे यांनी सूत्रसंचालन केले. सुदाम शिंदे यांनी आभार मानले.

Pune, District-Today
11/03/2022 Page No. 4

# गावगाड्यातील मूल्यांची फेरमांडणी आवश्यक

## ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील : राजगुरूनगरात 'माझं गाव माझी माणसं'चे प्रकाशन



**राजगुरूनगर, दि. १५ (प्रतिनिधी)** - निवडणुकीच्या राजकारणामुळे ग्रामीण भागातील सामाजिक आरोग्य बिघडले असून गावगाड्यातून हरवत चाललेल्या मूल्यांची फेरमांडणी करणे आवश्यक आहे. त्यासाठी डॉ. संजय शिंदे यांच्या 'माझं गाव, माझी माणसं' या ग्रंथलेखनामुळे गावागावातील सामाजिक सलोखा वाढण्यास नक्कीच मदत होईल, असे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले.

ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांच्या हस्ते 'माझं गाव, माझी माणसं' या ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी संस्था उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक हिरामण सातकर, बाळासाहेब सांडभोर, डॉ. प्रकाश चौधरी, सरपंच नकुशा शिंदे, उपसरपंच विष्णू काळडोके, पंचायत समिती माजी सभापती सुरेश शिंदे, माथेरानचे माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर, माजी तालुकाध्यक्ष शिवाजी शिंदे, बाळासाहेब शिंदे, डॉ. शिरीष पिंगळे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य प्रा. एस. एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे, साईनाथ पाचारणे, शरद शिंदे, मारुती धंद्रे, दत्तात्रय सुतार, बाळासाहेब घोंगडे आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

नानासाहेब टाकळकर यांनी गावगाड्यातील व्यक्तिरेखांच्या पुस्तकाचे स्वागत करून गावागावात निवडणुकांच्या माध्यमातून वाढलेला व्यक्तिगत द्वेष कमी होऊन सर्वांनी एकत्र येऊन गावचा सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन केले. रोहिदास शिंदे यांनी पोवाडा सादर केला. सूत्रसंचालन कैलास मुसळे यांनी केले तर आभार सुदाम शिंदे यांनी मानले.

प्रभात Wed, 16 March 2022
https://epaper.eprabhat.net/c/66857892

दैनिक **संध्या** नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक

# गावगाड्यातील सामाजिक सलोखा वाढावा : ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील

राजगुरुनगर (दै. संध्या) :

निवडणुकीच्या राजकारणामुळे ग्रामीण भागातील सामाजिक आरोग्य बिघडले असून, गावगाड्यातून हरवत चाललेल्या मूल्यांची फेरमांडणी करणे आवश्यक आहे. त्यासाठी डॉ. संजय शिंदे यांच्या 'माझं गाव, माझी माणसं' या ग्रंथलेखनामुळे गावागावातील सामाजिक सलोखा वाढण्यास नक्कीच मदत होईल असे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले. ते आंबोली येथे आयोजित डॉ. संजय शिंदे यांनी लिहिलेल्या 'माझं



गाव, माझी माणसं' या पुस्तक प्रकाशन कार्यक्रमात बोलत होते. याप्रसंगी संस्थाउपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक हिरामण सातकर, बाळासाहेब सांडभोर, डॉ. प्रकाश चौधरी, सरपंच नकुशा शिंदे, उपसरपंच विष्णू काळडोके, माजी सभापती सुरेश शिंदे, माथेरानचे माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर, माजी तालुकाध्यक्ष शिवाजी शिंदे, बाळासाहेब शिंदे, डॉ.शिरीष पिंगळे, प्राचार्य डॉ.एच.एम. जरे, अक्षरवायय प्रकाशनचे बाळासाहेब घोंगडे, उपप्राचार्य प्रा. एस. एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे, साईनाथ पाचारणे, शरद शिंदे आणि ग्रामस्थ उपस्थित होते. ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील पुढे बोलताना म्हणाले की, डॉ. संजय शिंदे यांच्या ग्रंथलेखनामुळे मातीतल्या माणसांच्या चांगुलपणाची, नेतृत्वाची, कर्तृत्वाची उजळणी झाली असून समाजात सकारात्मक संदेश देण्याचे काम त्यांनी केले आहे. नानासाहेब टाकळकर यांनी गावगाड्यातील व्यक्तिरेखांच्या पुस्तकाचे स्वागत करून गावागावात निवडणुकांच्या माध्यमातून वाढलेला व्यक्तिगत द्वेष कमी होऊन सर्वांनी एकत्र येऊन गावचा सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न करावा, असे सांगितले. डॉ. प्रकाश चौधरी म्हणाले की, डॉ. संजय शिंदे यांनी समाजभान जपताना गावगाड्यातील व्यक्तिरेखांना वैश्विक बनवले असून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक चळवळीचे प्रतिबंध या पुस्तकातून व्यक्त झाले आहे. प्रास्ताविकात डॉ. संजय शिंदे यांनी गावगाड्यातील माणसांचे जगणे, त्यांचे परस्परसंबंध गावाबद्दलची आत्मीयता, संकटाच्या प्रसंगी गावपण टिकवण्यासाठी घेतलेली भूमिका अशा अनेक बाबींमधून या पुस्तकातील व्यक्तिमत्वे आकाराला आल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कैलास मुसळे यांनी तर आभार सुदाम शिंदेपाटील यांनी मानले.

# 'गावगाड्यातील सामाजिक सलोखा वाढावा'

**राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क**

**राजगुरुनगर :** निवडणुकीच्या राजकारणामुळे ग्रामीण भागातील सामाजिक आरोग्य बिघडले असून, गावगाड्यातून हरवत चाललेल्या मूल्यांची फेरमांडणी करणे आवश्यक आहे. त्यासाठी डॉ. संजय शिंदे यांच्या 'माझं गाव, माझी माणसं' या ग्रंथलेखनामुळे गावागावांतील सामाजिक सलोखा वाढण्यास नक्कीच मदत होईल, असे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले. ते आंबोली येथे आयोजित डॉ. संजय शिंदे यांनी लिहिलेल्या 'माझं गाव, माझी माणसं' या पुस्तक प्रकाशन कार्यक्रमात बोलत होते.




याप्रसंगी संस्था उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक हिरामण सातकर, बाळासाहेब सांडभोर, डॉ. प्रकाश चौधरी, सरपंच नकुशा शिंदे, उपसरपंच विष्णू काळडोके, माजी सभापती सुरेश शिंदे, माथेरानचे माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर, माजी शिवसेना तालुकाप्रमुख शिवाजी शिंदे, बाळासाहेब शिंदे, प्रभारी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य प्रा. एस. एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे, साईनाथ पाचारणे, शरद शिंदे आणि ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. प्रकाश चौधरी, मारुती धंद्रे, बाळासाहेब शिंदे, दत्तात्रय सुतार बाळासाहेब घोंगडे यांनी मनोगत व्यक्त केले. रोहिदास शिंदे यांनी पोवाडा सादर केला.

दै. राष्ट्रसंचार

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभाग प्रमुख**